ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – IV December 2013

# अहिल्याबाई होळकर एक मुत्सद्दी राजकारणी

प्रा. किशोर काजळे,
ज. ए. इ. चे महिला महाविद्यालय,
डोंबिवली ( पूर्व )

मराठयांच्या इतिहासात थोर पुरुषांप्रमाणे थोर स्त्रियांचीही कमतरता नाही. त्यांची संख्या कमी असली तरी त्यांचे कार्य भरीव व प्रेरक आहे. या थोर आदरणीय स्त्रीयांची मालिका डोळयापुढे आणली की, मन आदराने भरुन येते आणि डोळे त्यांच्या कतृत्वाने दिपून जातात. या आदरणीय स्त्रीयांपैकी प्रत्येकजण आपआपल्यापरीने श्रेष्ठ असल्या तरी त्यातल्या त्यात जिजामाता, अहिल्याबाई व लक्ष्मीबाई यांच्या विषयी मराठयांना विशेष आदर व भक्ती वाटते. जेष्ठत्वाचा मुजरा जिजामातेला, पराक्रमाचा हार लक्ष्मीबाईला तर धर्मराजकारणाची मौल्यवान शाल पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांना द्यावी लागेल. दैवयोगाने म्हणा किंवा परिस्थितीमूळे म्हणा अहिल्याबाईस धर्म व राजकारण या दोन्ही क्षेत्रात कतृत्व दाखविण्याची संधी मिळाली. जवळपास 30 वर्षे इंदोरच्या संस्थानची ती रक्षणकर्ती होती. पहिल्या बाजीरावापासून ते माधवराव पेशव्यापर्यंतच्या कारकिर्दीतील अनेक उलाढाली तिला पाहता आल्या तिच्या धार्मिक आणि राज्यकारभार विषयक कतृत्वाला मराठयांच्या इतिहासात तोड नाही तिचे व्यक्तिगत जीवन अत्यंत दूर्दैवी, दु:खी असफल असतांनाही तिने हे कतृत्व दाखविले त्यामूळे ही स्त्री आदर्शवत झाली आहे. प्रशासकीय कार्य तिने मुत्सद्देगिरीने, सावधगिरीने व मोठया हुशारीने पार पाडले. येणाऱ्या संकटांना तिने मोठया हिंमतीने तोंड दिले न डगमगता प्रशासनात सुरळीतपणा आणला संस्थानाच्या विकासासाठी तिने नेहमी दूरदृष्टीकोन पाहिला, इंग्रजासारख्या परकीय सत्तेचे भविष्यकालीन परिणाम लक्षात घेवून वेळीच सावध होण्याची सूचना केली. आपल्या व्यक्तिमत्वामुळे परकीय संस्थानिकांवर आदरयुक्त दबाव निर्माण करुन संस्थानात समृध्दता निर्माण केली, धार्मिक कार्यात तर ''जिथे धार्मिक स्थळ तिथे बाईची कीर्त'' असे सूत्रच निर्माण केले. एका स्त्रिच्या ठिकाणी प्रशासन चालविण्याची एवढी ताकत असावी याचे मोठे अल्पप वाटते. त्यामुळेच तिने मुत्सद्देगिरीने केलेले राजकारण जाणून घेणे आवश्यक आहे.

**पूर्वायुष्य :–**

मराठयांच्या गौरवशाली इतिहासात अनेक कतृत्ववान स्त्रियांनी आपले वेगवेगळे स्थान निर्माण केले त्याप्रमाणे अहिल्याबाईचे स्थान व महत्व काही वेगळेच आहे. माल्कमने जिच्याबद्दल ''अहिल्याबाईच्या राज्यात जेवढी प्रजा सुखी होती तेवढी कुणाच्याही राज्यात नव्हती'' असे म्हटले आहे. अशा सर्वगुण संपन्न स्त्रीच्या कतृत्वाबद्दल जाणून घेण्याची अभिलाषा कुणाला बरे होणार नाही!

अहिल्याबाईंच्या प्राथमिक आयुष्याबद्दल कोठेही माहिती उपलब्ध झालेली नाही परंतू तिच्या उत्तर

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – IV December 2013

आयुष्यावरुन व त्यावेळी घडलेल्या काही घटनांवरुन तिच्या पूर्वचरित्राबद्दल काही अनुमाने बांधता येतात. अहिल्याबाईंच्या वडीलांचे नाव मानकोजी शिंदे असून ते बीड जिल्हयात चौढी गावचे प्रतिष्ठीत गृहस्थ होते तेथेच अहिल्याबाईंचा जन्म 1725 मध्ये झाला असे सरदेसाई, ठाकूर, पारसनीस यांनी स्पष्ट केले. तिला लिहिण्यावाचण्याचे शिक्षण आईवडीलाकडेच मिळाले. वयाच्या आठव्या वर्षी तिचा विवाह मल्हारराव होळकरांचा मुलगा खंडेराव हयाच्याषी 1733 पूणे येथे झाला. तिला भालेराव व मुक्ताबाई अशी दोन अपत्ये झाली. मल्हाररावांच्या तालमित तिने राजकारणाचे धडे गिरविले. परंतू लवकरच तिच्यावर एकामागून एक दुःखाचे डोंगर कोसळले. 1754 मध्ये तिचा पती खंडेराव कुंभेरीच्या लढयात कामास आला. त्यावेळी तत्कालिन प्रथेप्रमाणे तिने सती जाण्याची तयारी केली. मात्र सासऱ्याच्या विनंतीमूळे तिने आपला निर्णय बदलला. 1767 मध्ये तिचा मुलगा इंदोर मध्ये मरन पावला त्यापूर्वी सासू–सासऱ्याचा मृत्यू होऊन अहिल्येचे छत्र हरपले. अशा कारुण्यमय स्थितीतसुध्दा मोठया कठोर अंतःकरणाने ‘जगाच्या कल्याणा संताच्या विभूती’ या उक्तीप्रमाणे परमेश्वराची ईच्छा समजून प्रजेच्या हितासाठी तिने आपले आयुष्य वेचले.

**मुत्सदी राजकारण :–**

मल्हारराव होळकरांच्या मृत्यूनंतर अहिल्याबाईने इंदोर संस्थानाची सर्वोतोपरी काळजी घेतली व संरक्षण करुन उत्पन्न वाढविले. वास्तविकतः ही जबाबदारी तिच्यावर अचानक आली नव्हती तर समजू लागल्यापासून तिने राजकीय कार्यात लक्ष घातले होते. वयाच्या 24 व्या वर्षी राज्यकारभार करण्यास ती समर्थ झाली होती. मल्हाररावानी सोपविलेली कामे ती चातुर्याने करीत असे प्रत्येक प्रकरणाची मांडणी ती इतकी व्यवस्थित करीत असे की, जमदग्नीचा अवतार असलेले मल्हारराव सुध्दा तिचे म्हणणे ऐकून घेत असत. तिची कुशाग्र आणि तिक्ष्ण बुध्दी पाहूनच तिच्यावर फार लवकार सरकारी कामे मल्हाररावांनी सोपविली होती. अहिल्याबाईने प्रत्यक्ष युध्द लढले नाही परंतू सरहिंद, बक्सार, कोटा या तिन युध्दावर जाण्याचा प्रसंग तिच्यावर आला होता. त्यामूळेच तिला युध्दातील मांडण्या, डावपेच हे प्रकार अवगत झाले. अहिल्याबाईंच्या मनात मल्हाररावाबद्दल किती आदर व अभिमान होता याचे उदाहरण म्हणजे एकदा महादजी शिंदेचा कारभारी बाळराव हा तुकोजीला पैसा मिळत नाही या सबबीखाली बाईंच्या कारभाराचा हिशेब तपासण्यासाठी 1780 मध्ये महेश्वरास आला, त्यावेळी अहिल्याबाई म्हणाली ‘‘..... तुम्हासही कळले असू द्या. मी सुभेदाराची सून आहे. केवळ तुकिोजीबावाच दौलतीचे धनी आणि मी कशात काही नाही. असे समजू नका. तुकोजीबावा हे माझे हातचे कामास लावलेले आहेत’’ या उद्‌गारातून तिची मल्हाररावाप्रतिची निष्ठा स्पष्ट होते.

मल्हाररावाच्या मृत्यूनंतर तिने संस्थानचे सर्व कामकाज पाहिल्यामुळे तिचे नाव चहुकडे झाले. पुणे दरबारात तिच्या चातुर्याची व किर्तीची प्रसिध्दी झाली. संपूर्ण पत्रव्यवहार तिच्या नावाने सुरु झाला. आणि ती होळकर संस्थानची संरक्षक बनली. त्यानंतर तिच्यावर अनेक कठिण प्रसंग आले. तेव्हा तिने

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – IV December 2013

मुत्सद्देगिरीने त्या संकटांचा सामना केला.

**चंद्रावताचा बंदोबस्त :–**

चंद्रावत हे चंद्र वंशातले म्हणून त्यास चंद्रावत म्हणतात. सुमारे सहा–सातशे वर्षापूर्वी उदेपूरच्या घराण्यात मुनसी नावाचा शुर राजा होऊन गेला. त्याला चंद्र नावाचा मुलगा होता. त्याने रामपूर, भानपूर येथे चंद्रावत राज्याची स्थापना केली होती. या चंद्रावताने मल्हाररावाच्या मृत्यूनंतर 1768 मध्ये उठाव केला. तेव्हा अहिल्याबाईने फौज पाठवून लक्ष्मणसिंह चंद्रावताला तह करण्यास भाग पाडले. येथे अहिल्याबाईने आपसातील संघर्ष वाढु नये म्हणून सामदामाचा वापर केला परंतू हे प्रकरण इथेच न मिटता वेळोवेळी उचल खात राहिले.

1771 मध्ये चंद्रावताने पुन्हा बंड केले तेव्हा अहिल्याबाईने पेंढाऱ्यांना एकत्र करुन शरीफभाईच्या नेतृत्वाखाली दिले आणि त्यांना ताकीद दिली की ''मेवाड होते की नव्हते असे करुन टाका.'' या युध्दाची सुत्रे स्वतः बाईनी चालविली. सुरुवातीला होळकर सैन्यांची पिछेहाट झाली. त्यामुळे बाईने जेवढी फौज जमविता येईल तेवढी जमवून लगेच पाठविली परिणामी होळकरांच्या सैन्याने रजपूत सैन्याला घेरले. एवढया लवकर होळकर सैन्याच्या हालचाली होतील याची कल्पना रजपूतांना नव्हती. त्यामुळे रजपूत सेनापती केशरसिंह घाबरला. त्याने आत्मसमर्पण करुन तहाच्या वाटाघाटी सुरु केल्या. अशावेळी अहिल्याबाईना रजपूतांना नष्ट करता आले असते. परंतू युध्दातून हानीच होते असा दुरदृष्टीचा विचार करुन रजपूत राणाशी मैत्री करुन सन्मानपूर्वक व्यवहार केला. त्यापाठीशी बाईचा मुत्सद्दी दृष्टीकोन होता की रजपूतांनी पुढे बंड न करता मैत्रीपूर्ण संबंध ठेवावे. म्हणूनच पुढे 10–11 वर्षे चंद्रावतानी तोंड वर काढले नाही.

1782 मध्ये पावसाअभावी दूष्काळी स्थिती निर्माण झाली. तेव्हा भिल्ल व सोंधी या लुटमारु जमातींना सोबत घेऊन चंद्रावतानी होळकर प्रांतातील गावे लुटावयास सुरुवात केली. हे वर्तमान कळताच अहिल्याबाईने आबाजी विष्णूला सैन्य देवून परिपत्यासाठी पाठविले. आबाजी विष्णूने पडता व मनसा येथील चंद्रावताची तटबंदी पाडून टाकली. 1783 मध्ये भाटखेडीचा चंद्रावत आणि दतोतीचा सालसिंह यांनी बंड करुन कंजार्डागांव ताब्यात घेतले. तेव्हा बाईने नानाजी भास्कर सोबत तोफा व सैन्य पाठविले. लक्ष्मण तानदेवाला दोनशे घोडेस्वार, एक हजार पायदळ व दोन तोफा देवून रवाना केले. त्यामुळे चंद्रावताचा पराभव होवून त्याने तह केला. त्यानूसार असे ठरविण्यात आले की विजसिंह व लक्ष्मणसिंह यानंतर युध्द करणार नाहीत आणि रामपुऱ्यातील होळकरांच्या मामलेदाराला सहकार्य करतील. या तहामूळे चंद्रावत अहिल्याबाईच्या सामर्थ्यापुढे काही काळ दबून राहिले. परंतू चंद्रावताच्या मनातील सुडाची भावना मिटलेली नव्हती. त्यासाठी ते योग्य वेळेची वाट पाहत होते. अशी संधी चंद्रावताना 1787 मध्ये मिळाली.

1787 च्या लालसोटच्या युध्दात रजपूतांनी महादजी शिंदेचा पराभव केला. या संधीचा फायदा

घेवून राजपुतान्यातील रजपूतांनी मराठी वर्चस्व झुगारुन देण्याचे ठरविले. याचवेळी रामपूरच्या चंद्रावताने बंड करुन रामपूरा घेतला. अहिल्याबाईला हे वर्तमान कळताच चंद्रावताचा बिमोड करण्यासाठी आबाजीपंत व राधोरणसोड यांचे मावसबंधू यांच्या नेतृत्वाखाली दीड हजार पायदळ व काही घोडेस्वार देवून पाठविले. मेवाड प्रांतातील चकरडा येथे सैन्याची गाठ पडली त्यामध्ये आबाजीपंत मारले गेले. परिणामी रजपूत सैन्य आक्रमक बनले. अशा कठिण प्रसंगी अहिल्याबाईने मुत्सद्देगिरीचा वापर केला. रजपूतांना पराभूत करण्यासाठी अनुभवी सेनापतीची गरज तिने ओळखली म्हणूनच चंद्रावताचा पराभव करणारा शरीफभाई या अनुभवी व्यक्तिस सेनापतीची वस्त्रे देवून गौरव केला आणि ससैन्य पाठविले. अहिल्याबाईने केलेल्या गौरवामुळे शरिफभाईचा उत्साह दुणवला. परंतू अहिल्याबाई एवढयावरच थांबल्या नाही. होळकर सैन्यात युध्दस्फूर्ती वाढावी यासाठी त्या स्वतः रणक्षेत्राकडे निघाल्या. तर दुसरीकडे तुकोजी होळकरला पाचहजार घोडेस्वार देवून मदतीला पाठविले. यावेळी युध्दाची रचना स्वतः अहिल्याबाईने केली. मरगळलेल्या रजपूतावर नविन दमाच्या फौजेने हल्ला करावा यासाठी युध्दक्षेत्रापासून काही अंतरावर नाला व झाडीत तीन हजार सैन्य लपवून ठेवले. अहिल्याबाईची ही मुत्सद्देगिरी यशस्वी ठरली. हर्कीयाखाल जवळ चल्दू येथे रजपूत सैन्याचा पराभव होवून मालदास मेहता व कुशलसिंह मारले गेले. तर सुल्तानसिंह जमखी होऊन कैद झाला. रजपूतांचा व चंद्रावताचा कायमचा बंदोबस्त करण्याची ही संधी आहे हे अहिल्याबाईने ओळखले म्हणूनच तिने होळकर सैन्याला निंबहेडा व रानीखेडा हे प्रदेश जिंकण्यास सांगून तेथे सैनिक चौक्या कायम केल्या. त्यानंतर चंद्रावताच्या रामपूऱ्यावर सैन्य पाठवून त्यास पळून जाण्यास भाग पाडले. अशावेळी रजपूतांमध्ये दहशत निर्माण व्हावी म्हणून शोभासिंहास तोफेच्या तोंडी दिले. परिणामी त्याचे भाऊ शिक्षेच्या भितीने पळून गेले. अहिल्याबाईने चंद्रावताची जहागिर जप्त केली आणि मेवाड व राजस्थानमध्ये आपला दबदबा निर्माण केला.

अहिल्याबाईच्या या पराक्रमाबद्दल पुणे दरबारात फार मोठे कौतुक करण्यात आले. नाना फडणीसाने ''शापादापि शरादपि'' असे उद्‌गार काढून तोफा उडविल्या. दरबार भरवून 6 घटकेपर्यंत बाईचे स्तुतीस्तोत्र केले. अशाप्रकारे 1768 पासून चंद्रावतांनी सुरु केलेल्या बंडाचा बिमोड 1795 मध्ये केला. चंद्रावताच्या प्रत्येक बंडाच्यावेळी तुकोजी होळकर संस्थानाबाहेर होते. अशावेळी अहिल्याबाईने संपूर्ण जबाबदारी स्विकारुन तोंड दिले. सुरुवातीला सामदामाचा उपाय करुन पाहिला परंतु शत्रुला त्याची किंमत कळत नाही हे ओळखून दंडनितिचा अवलंब केला. शत्रु पूर्ण ताब्यात आला असतांनासुध्दा त्याचा समुळ उच्छेद न करता त्यास पुन्हा जहागिरी दिली. एवढेच नव्हे तर दुःखप्रसंगी सांत्वनाचे पत्र पाठवून मनाचे औदार्य दाखविले. यातच बाईची मुत्सद्देगिरी दिसून येते. अहिल्याबाईच्या तीस वर्षाच्या काळातील ही पहिली आणि शेवटची बंडाळी ठरली आणि तिचा शेवट यश मिळविण्यात झाला.

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – IV December 2013

**रघुनाथराव पेषव्याषी संघर्ष :–**

मराठयाच्या इतिहासात रघुनाथरावाची भूमिका मराठयांच्या ऱ्हासास बहुतांषी कारणीभूत होती असे दिसून येते. सुखात दुःखाग्नी निर्माण करण्याचे कार्य रघुनाथरावा कडून अनेक बाबतीत घडले असाच एक प्रसंग अहिल्याबाईच्या संबंधात सुध्दा घडला पण बाईंनी त्यावर मुत्सद्देगिरीने मात केली.

अहिल्याबाईचा एकुलता एक मुलगा मालेरावाच्या मृत्यूनंतर होळकराच्या गादीवर कुणास बसवावे असा प्रष्न निर्माण झाला होता. कारण हिन्दुधर्मषास्त्राप्रमाणे स्त्रिस राजगादीवर बसण्याचा अधिकार नव्हता. या स्थितीचा फायदा घेण्याचे होळकराचा दिवाण गंगाधर यषवंत याने ठरविले. त्याने रघुनाथरावांषी संधान बांधून संस्थान ताब्यात घेण्याचा डाव रचला. ही गोष्ट षिवाजी गोपाळ व राजाराम रणसोड या दरबारी मंडळीस कळाली परंतू पुत्रषोकाने व्याकुळ झालेल्या अहिल्याबाईस ही खबर देण्याची हिम्मत कुणीच करीत नव्हते. शेवटी दरबारी मंडळींनी ही बातमी हरकुबाई व उदाबाई वाघमारे या मल्हाररावाच्या दोन कन्यांना सांगितली. त्याप्रमाणे त्या दोघीनी अहिल्याबाईस सांगितले की, ''ब्राम्हण हरामखोरीस आला आहे. सावध झाल्यातच प्रांत, न जाहल्यास तुम्हा–आम्हास दाणे भरडावे लागतील. सावध व्हावे हा नेकसल्ला''. अहिल्याबाईनी प्रथम बातमी खरी असल्याची खात्री करुन घेतली. त्यानंतर पेषव्याच्या कपटी राजकारणावर टिका करीत त्या म्हणाल्या, ''.... मेल्या ब्राम्हणांने हरामखोरी आरंभिली आहे. परंतू मी बायको मणुष्य, मी काय करणार हे मनात आणू नका! मी खांद्यावर बासंडा टाकून उभी राहिली म्हणजे एक श्रीमंताचे दौलतीस अवघड पडेल. ही दौलत आमच्या वडीलांनी भांडभवई करुन मिळविली नाही! तर तरवारीचे अनूमाने शरीर खर्च घातले आहे. आम्ही सिलेदार वडीलांचे चाकरीप्रमाणे चाकरी घेतल्यास हजर आहोत. धुणीपाणी सरली असल्यास मोगलाईची चाकरी करु अथवा फिरंग्याची करु अगर पाहिजे ते करु. पण ब्राम्हण म्हणतील दौलतीचा अभिलाष करु तर ते होणार नाही''. वरील वक्तव्यावरुन असेच स्पष्ट होते की, अहिल्याबाईची आपल्या संस्थानावर निष्ठा होती. त्याकडे वाईट दृष्टीने पाहणाऱ्या पेषव्यांचाही मुलाहीजा केला जाणार नाही असेच त्यावरुन सिध्द होते. रघुनाथरावाच्या या कुटील डावाचा सामना करण्यासाठी अहिल्याबाईने भोसले, गायकवाड, दाभाडे, महादजी षिंदे यांना मदतीची गुप्त पत्रे पाठविली. तुकोजी होळकराला तात्काळ येण्याचा निरोप पाठविला. त्याचवेळी गंगाधार यषवंतने अहिल्याबाईस तिर्थयात्रेस जाण्याचा सल्ला दिला. परंतु अहिल्याबाईस त्याचा डाव आधीच माहित झाल्यामुळे तिने बाणेदार उत्तर दिले. ब्राम्हणांच्या बायकाप्रमाणे कर्तव्यापासून दूर जाणाऱ्यापैकी आम्ही नव्हे. म्हणून होळकराच्या गादीचा वारस कोण असावा याचा निर्णय आम्ही स्वतः घेणार. बाईच्या या उत्तरामुळे गंगाधर यषवंत व रघुनाथरावाने युध्दाची तयारी केली. रघुनाथराव ससैन्य माळव्यात आला. अषाप्रसंगी अहिल्याबाईस सर्व मराठे सरदारांनी आपला पाठिंबा दिला होता. तुकोजी होळकर फौज घेवून मदतीला आलेला होता त्यामुळे युध्दाने रघुनाथरावाची रग जिरवता आली असती पण अहिल्याबाईने मुत्सद्देगिरीने हे प्रकरण सोडविले. युध्द झाल्यास मराठयांमध्येच रक्तपात घडणारा होता. म्हणून तीने रघुनाथरावाला

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – IV December 2013

मुत्सद्देगिरीचा निरोप पाठविला, ''या युध्दात मी हारले तर मला कुणी नाव ठेवणार नाही. परंतू तुम्ही हारला तर जगात तुमचे हसे होईल तेव्हा लढाई न करण्यातच तुमचे कल्याण''. या प्रसंगाच्यावेळी अहिल्याबाईंनी दोनषे स्त्री स्वार पुढे आनले. तेव्हा रघुनाथराव बुचकाळयात पडला. त्याने विचारले सैन्य कोठे आहे. यावर बाईने उत्तर दिले की, स्त्री राज्य करते तेव्हा हेच तिचे सैन्य समजा''.

अहिल्याबाईची उत्तम तयारी पाहून रघुनाथरावाने महादजी षिंदेला मदत मागितली परंतू महादजीने नकार दिला. परिणामी रघुनाथराव फौज घेवून उजैनजवळ आला. तोपर्यंत सर्व मराठे सरदाराच्या फौजा अहिल्याबाईच्या मदतीस धावून आल्या होत्या. तुकोजी होळकराने असा निरोप पाठविला की, ''विचार करुनच पुढे पाऊल टाकावे'' याचवेळी रघुनाथरावाच्या सैनिकांनी सुध्दा अहिल्याबाई विरुध्द लढण्यास नकार दिला होता. परिणामी रघुनाथरावास माघार घेणे भाग पडले. परंतू माघारी फीरलो तर प्रतिष्ठा जाईल म्हणून प्रतिष्ठा सांभाळण्यासाठी तुकोजीला कळविले की, आम्ही मालेरावाच्या मृत्यूमुळे सांत्वन करण्यासाठी आलो. त्यावर तुकोजीने साजेषे उत्तर दिले की. सांत्वनासाठी एवढया फौजेची गरज काय. त्यामुळे रघुनाथराव पाच–दहा सरदारांसोबत इंदौरास आले व गुजरातच्या वाटेने परत गेले. या सर्व प्रकरणात रघुनाथरावाचा बेजबाबदारपणा दिसून आला. त्याची प्रतिमा मलिन झाली तर अहिल्याबाईच्या स्वभावातील तडफ, हिम्मत, आत्मविष्वास व मुत्सद्देगिरी दिसून आली.

अषाप्रकारे आपल्या मुत्सद्देगिरीने विना रक्तपाताने अहिल्याबाईने रघुनाथरावाच्या स्वारीला परतवून लावले. त्यामुळे बाईची प्रतिष्ठा अधिक वाढली.

**महादजी षिंदेषी संबंध :–**

थोरल्या बाजीरावाच्या साम्राज्य विस्ताराचे श्रेय षिंदे–होळकर सरदारास द्यावे लागेल. ही जोडी स्वकतृत्वाने मराठेषाहीत गाजली. म्हणूनच त्यांच्याकडे नर्मदेपलीकडील हिंदुस्थानाचा कारभार सोपविला. मल्हारराव होळकराच्या मृत्यूनंतर महादजीने अहिल्याबाईषी सदैव स्नेहाचे संबंध ठेवले. अनेक कठिण प्रसंगी अहिल्याबाईस मदत केली. त्यांचे उदाहरण म्हणजे नाना फडणीसाने जेव्हा सर्व कारभार बाईकडून तुकोजी होळकराकडे सोपविण्याचा प्रयत्न केला तेव्हा मध्यस्थि करण्याची विनंती महादजीस केली. त्यास महादजीने खंबीर उत्तर दिले की, ''मल्हारराव हयात असतांना गौतमाबाई कारभार करीत होत्या. त्या वारल्यावर अहिल्याबाई करु लागल्या तेव्हा तूम्ही त्यांच्या कारभारात लुडबुड करण्याचा प्रयत्न करु नये''. महादजी–अहिल्या संबंधात माल्कम साहेब सुध्दा लिहितात की, '' अहिल्याबाईस आपल्या राज्यातील अंतर्व्यवस्थेत महादजीचे पुष्कळ सहाय्य झाले होते. त्याचप्रमाणे होळकरांचेही पण महादजीवर उपकार होतेच. ती त्याच्याषी शेवटपर्यंत स्नेहभावानेच वागली''. याचा अर्थ अहिल्या–महादजी संबंधात कधीच बेबनाव आला नाही असे म्हणता येईल. असे असून सुध्दा अहिल्याबाईने अनेक प्रसंगी भिडमुर्वत ठेवली नाही. पहिला प्रसंग महादजी पूण्यास जातांना घडला. महादजीने दहीहंडयाच्या घाटातील बाईची गढी

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – IV December 2013

खाली केली. तेव्हा बाई संतापून म्हणाली, ''हा मेला पुन्हा हिन्दुस्थान पाहत नाही''. दुसऱ्या प्रसंगी वसईच्या लढाईत महादजी इंग्रजाकडून पराभूत झाला. तेव्हा त्याची कारणे महादजी अहिल्याबाईजवळ सांगू लागले, तेव्हा बाई बोलल्या ''...... तुम्ही एक नव्हे शंभर कारणे सांगा पण वसई कायम असती तर चिंता नव्हती. त्यामुळे तूमचे सर्व बोलणे व्यर्थ''. यावरुन आपल्या प्रदेषाची बाईला किती चिंता होती हे दिसून येते. तिसरा प्रसंग तुकोजी होळकरामुळे आला. तुकोजीने बाईला न विचारला दिवाणाची बदली केली. तेव्हा बाई रुष्ठ झाल्या त्यावेळेस तुकोजीने महादजीस मध्यस्ती करण्याची विनंती केली, तेव्हा सुरवातीला महादजीने नकारच दिला. परंतू शेवटी घरचे काम म्हणून मध्यस्ती करण्याचे मान्य केले. मात्र इंदोरास तीन महिने राहुनही त्यांना बोलण्याची हिंम्मत झाली नाही. यावरुन बाईच्या प्रषासनाचा दबदबा दिसून येतो. शेवटी महादजीने मोठी हिम्मत करुन अहिल्याबाईस प्रष्न केला की, ''आम्ही पुरुष जातीवर आलो तर काय कराल''. यावर बाईने अतिषय बाणेदार उत्तर दिले. ''तुम्ही आपल्या कायका सुपारीच्या खांडाप्रमाणे तोंडात टाकल्या तसा सल्ला तुकोजीस देवून चालून यावे. मग तुम्हाला मल्हाररावाच्या सूनेचा पराक्रम दिसेल परंतू अषा चूका कराल तर तुम्हांस मार्तडांची षपथ''. बाईच्या या उत्तराने महादजीने हसण्यावर गोष्ट नेली आणि सांत्वन करुन शेवटी मध्यस्ती न करताच निरोप घेतला.

महादजी–अहिल्या संबंधात महादजी पराक्रमी मराठा सरदार सुध्दा अहिल्याबाईच्या प्रषासकीय कर्तृत्वाला सलाम करीत असल्याचे स्पष्ट होते.

**अहिल्या–तुकोजी संबंध :–**

तुकोजी होळकर हे मल्हाररावाच्या वंषातील नातेवाईक होते. त्यामुळे मल्हाररावाच्या मृत्यूनंतर माधवराव पेषव्याने होळकराच्या प्रषासनाचे दोन भाग केले. राज्यव्यवस्था अहिल्याबाईकडे तर लष्करी व्यवस्था तुकोजीकडे सोपविली. वास्तविकतः तुकोजी बाईपेक्षा वयाने वरिष्ट असतांनाही त्यांने राजगादीची अपेक्षा न करता षेवटपर्यंत बाईच्या आज्ञेत राहून काम केले याचा अर्थ त्यांच्यात कधीच बेबनाव आला नाही असे मात्र नव्हे. परंतू त्यांच्यातील संघर्षाने कधीही उग्र स्वरुप धारण केले नाही. या संदर्भात माल्कम साहेबांनी फार सखोल चौकषी केली. परंतू त्यांच्याविषयी कुणीही वाईट बोलले नाही. मात्र रिसायतकार म्हणतात की अहिल्या–तुकोजीचे 30 वर्षात कधीच पटले नाही. परंतू त्यांच्या म्हणण्यात तेवढा मतीतार्थ वाटत नाही. कारण फौजेच्या खर्चाचा वाद सोडला तर अहिल्या – तुकोजीच्या संबंधात कधिही वाद उत्पन्न झाला नाही. अहिल्याबाईने आपल्या मुत्सद्देगिरीने तुकोजीवर नेहमी प्रेमपूर्वक दबाव ठेवला. आपल्या प्रषासकीय कर्तृत्वाने तुकोजीला त्यांच्या चुका लक्षात आणून दिल्या. त्याचे उदाहरण म्हणजे तुकोजीने जेव्हा पूणे दरबारात बाई फौजेस खर्च देत नाही अषी तक्रार केली. तेव्हा नाना फडणीसाने या स्थितीचा फायदा घेण्याचे ठरविले परंतु बाईने आकडेवारी सहीत तुकोजीचा वायफळ खर्च स्पष्ट करुन दाखविला. परिणामी तुकोजीचा दिवाण नारो गणेष व नाना फडणीसाला काहीच करता आले नाही. तुकोजीच्या

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – IV December 2013

पराक्रमाचा आढावा घेतांना बाई म्हणतात, ''..... प्रथम तो घोडेपचे साली दादासाहेबाकडे डौल दिला ते दादासोबाचे तसे झाले ते मसलत फसली. दुसरे हिन्दुस्थानात गेल्यावर जावदेखानाचा पक्ष केला, शेवटी त्यास तळावरच बसविले, देषी राजश्री मोरोबा दादाचा पक्ष केला तो पाहेल्यातच आहे. रघुपत पारायणचा पक्ष केला तो कित्ले नषीन केले. गोविंदराव गायकवाडचा पक्ष केला ते भिक मागत फीरत आहेत''. यावरुन असेच स्पष्ट होते की, अहिल्याबाईची प्रतिमा स्वच्छ व निर्मळ होती. त्यामुळेच तिच्याकडे बऱ्याच लोकांचा ओढा होता. तुकोजीषी तिचे संबंध काही प्रसंगी जरी बिघडले तरी बहुतांषी स्नेहाचेच होते असे दिसून येते. गृहकलह निर्माण होण्यास तुकोजीच्या सभोवतालचे लोक कारणीभूत होते हे बाईने ओळखले होते. म्हणून उद्‌भवल्या प्रसंगाला तिने मोठया षिताफीने व हुषारीने मार्गी लावले यातच तीचे राजकीय मुत्सद्दी धोरण दिसून येते.

**लष्कर व्यवस्था :–**

सांम्राज्याचे महत्वाचे अंग म्हणजे लष्कर होय. जेवढे लष्कर सक्षम तेवढी त्या राज्यांची सुरक्षितता म्हणून सैन्य कमी करणे किंवा दुर्बल बनविणे म्हणजे पाठीचा कणा मोडून घेण्यासारखे होय. याची तिला पुरती जाणीव होती. परंतू मल्हाररावाच्या मृत्यूनंतर सैन्य व्यवस्था तुकोजीकडे सोपविल्यामुळे तिला सैन्याचे नेतृत्व करता आले नाही. तरीसुध्दा तिने लष्कर प्रबळ ठेवण्यासाठी वेळोवेळी मार्गदर्षन केले. सैन्य महत्वाचे बाळकडू तिला सासऱ्याकडूनच मिळाले होते. म्हणूनच तिने पेषव्याला सुध्दा अधिक सैन्य ठेवणे महत्वाचे कसे हे पत्राव्दारे पटवून दिले होते. पेषव्याचा वचक कमी का झाला याची कारणमिमांसा करतांना बाई म्हणतात, ''थोरले बाजीराव व थोरले माधवराव यांच्या मनगटात बळ होते व फौज मोठी होती म्हणून सरदार वचकून असत''. यावरुन लष्कराचे महत्व तिला अधिक कळत असण्याचे स्पष्ट होते. प्रसंगी तिने मराठा लष्करातील दोषही स्पष्ट केले होते. मराठे आपल्या सैन्यात बाजारबूनग्याची अधिक भरती करतात. त्यामुळे हे पोटभरु लोक जिकडे जास्त पैसा मिळेल तिकडे जातात परिणामी मराठयांना हार पत्करावी लागते. मराठा लष्कराचे अवलोकन बाईने एवढया सुक्ष्मपणे केले होते. एवढेच नव्हे तर इंग्रजांची यषस्वी युध्दनिती अभ्यासून कवायती फौजेचे महत्व ओळखले. तलवार भाल्यापेक्षा बंदुका तोफांचे महत्व ओळखून आपले सैन्य इंग्रजाप्रमाणे प्रषिक्षीत व्हावे, यासाठी कर्नल बाईड नावाच्या युरोपीयन अधिकाऱ्यास तिने नोकरीवर ठेवले. यावरुन तिची दुरदृष्टी दिसून येते.

**किल्ले व्यवस्था :–**

सैन्याबरोबरच किल्ल्याचेही महत्व अहिल्याबाईने ओळखले होते. मध्य हिन्दुस्थनात सपाट भूमीवर किल्यांचा उपयोग कषापध्दतीने करता येईल याचा तिने विचार केला होता. होळकर संस्थानात एकूण सात किल्ले होते (महेष्वर, चांदवड, सेंधवा, अषिरगड, गाळणा, कुषलकड, हिंगलजगड) त्यापैकी महेष्वर किल्याचा उत्कर्ष अहिल्याबाईने घडवून आणला. बाईने किल्याची व्यवस्था कषी ठेवली या संदर्भात महेष्वर

दरबारच्या बातमीपत्रात विठ्ठल शामराज लिहितो की, ''.... बाहयात्कारे बाई किल्याचाही बंदोबस्त करितात. षिबंदी अरवगेरे सात–आठषे माणूस ठेवले आहे. पहिलेही चार–पाचषे माणूस आहे जागा–जागा बुरजावर तोफा, जंबुरे व सुरतनाला चढवितात, जागा–जागा नाकेबंदी करुन बंदोबस्ती करितात....'' यावरुन बाई किल्ल्याच्या व्यवस्थेकडे किती बारीक लक्ष देत होत्या त्याच बरोबर संरक्षणाच्या दृष्टीने किती दक्ष राहात होत्या हे कळते. सैन्याच्या महत्वा बरोबरच किल्ले, त्यावरील चोख व्यवस्था, सैन्यांचा पगार, चांगल्या सैन्याची पारख हया सर्वांचा बाईने बारकाइने विचार केला होता. त्यामुहे बाईची दुरदृष्टी वाखाणण्याजोगी आहे.

एकतर अहिल्याबाईने आपल्या 30 वर्षाच्या प्रषासनकाळात होळकरांचे संस्थान आपल्या राजकीय मुत्सद्देगिरीने टिकवून ठेवले. या संदर्भात महादजी षिंदेचा सेनापती राणेखानभाई याने अहिल्याबाईच्या योग्यतेचे एका वाक्यात वर्णन केले आहे ते म्हणजे ''तुम्हा सर्वांपेक्षा ती जास्त शहाणी आहे''. वास्तविकतः अहिल्याबाईच्या धर्मपरायणतेचाच सगळेजण गवगवा करतात. परंतू राजकीय दृष्टीकोणातून तिच्या कामगिरीचे महत्व स्पष्ट करीत नाहीत तेच मी स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :–**

1. खरे वा. वा., खरे ऐतिहासिक लेख संग्रह'' खंड – 3, आ .क्र. 1, कॉन्टीनेंटल प्रकाषन, विजयनगर, पुणे, 1985
2. ठाकूर वा. वा., होळकरषाहीच्या इतिहासाची साधने'', भाग 1, आ. क्र. 1, होळकर गव्हर्नमेंट प्रेस, इंदौर, 1944
3. पारसनीस द. ब., महेष्वर दरबारची बातमीपत्रे'' भाग 1 व 2 आ. क्र. 1, निर्णयसागर प्रेस, मुंबई, 1910
4. Malcom Sir John, Memoir of Central India, 1st Edn. Government Press Gwalior, 1942.
5. इंगळे राम, अहिल्याबाई होळकर, आ. क्र. 1 विष्वभारती प्रकाषन, धनवटे चेंबर्स, नागपूर, 1994
6. केळकर य. न., होळकरांची कैफियत, आ.क्र.2, हनुमान प्रकाषन, 718, सदाषिव पेठ, पुणे, 1972
7. गुजर यादव, मल्हारराव होळकर आणि त्यांचा काल, (आचार्य पदवी प्रबंध) नागपूर विद्यापीठ, 1982
8. ठाकूर वा. वा., होळकरषाहीचा इतिहास, भाग 1, आ. क्र.1, होळकर गव्हर्नमेंट प्रेस, इंदौर, 1963
9. पुरुषोत्तम, देवी श्री अहिल्याबाई होळकर सचित्रा चरित्र, आ. क्र. 1, अनंत आत्माराम कोरमकर, 402, ठाकूरव्दार, मुंबई, 1913.
10. सरदेसाई गो. स., मराठी रियासत उत्तर विभाग–2, आ. क्र. 1, श्री लक्ष्मीनारायण छापखाना, 364, ठाकूरव्दार, मुंबई, 1929